-: प्रेसनोट दिनांक - ०१/११/२०२५ :-

**आरोपी लोकसेवक ०१) संदेश आनंदा शेटे, वय - ३५ वर्षे, पोलीस कॉन्स्टेबल, ब.नं.८८५ नेमणुक हुपरी पोलीस ठाणे रा. नरंदे, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर, ०२) रणजित आनंदा बिरांजे, वय-३८ वर्षे, खाजगी इसम, रा. आण्णाभाऊ साठे चौक, पटटणकोडोली, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत.......**

---

तक्रारदार व त्यांचे मित्र जुगार खेळताना मिळुन आले होते त्यांचेवर गुन्हा नोंद न करण्यासाठी यातील आरोपी लोकसेवक संदेश आनंदा शेटे, पोलीस कॉन्स्टेबल, ब.नं.८८५ नेमणुक हुपरी पोलीस ठाणे रा. नरंदे, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर, ०२) रणजित आनंदा बिरांजे यांनी मिळुन तक्रारदार यांचेकडे १,००,०००/- रूपये द्यावे लागतील असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली होती. म्हणुन तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये मुळ तक्रारदार यांचेवर व त्यांचे मित्रांवर जुगाराचा गुन्हा नोंद न करण्यासाठी पोलीस संदेश शेटे यांनी तक्रारदार यांचेकडे बेकायदेशिरणे १,००,०००/- रूपयांची मागणी करून तडजोडी अंती ७०,०००/- रूपये लाचेची मागणी करून मागणी केलेली लाच रक्कम खाजगी इसम रणजीत बिरांजे यांच्याकडे देण्यास सांगितल्याचे तसेच खाजगी इसम रणजित बिरांजे याने पोलीस संदेश शेटे यांनी मागणी केलेल्या लाच रक्कम बेकायदेशिरपणे स्विकारणेस तयार होवुन सदरची लाच रक्कम तक्रारदार यांना घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी क्रमांक ०२ रणजित बिरांजे याने ७०,०००/- रूपये लाच स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक ०१) संदेश आनंदा शेटे, वय - ३५ वर्षे, पोलीस कॉन्स्टेबल, ब.नं.८८५ नेमणुक हुपरी पोलीस ठाणे रा. नरंदे, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर, ०२) रणजित आनंदा बिरांजे, वय-३८ वर्षे, खाजगी इसम, रा. आण्णाभाऊ साठे चौक, पटटणकोडोली, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द हुपरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार तसेच वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली श्री उज्वला भडकमकर पोलीस निरीक्षक, पो.ना.सचिन पाटील, पोकॉ संदिप पवार, पो.कॉ. कृष्णा पाटील, चा.स.पो.फौ. गजानन कुराडे ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमाकावर संपर्क साधावा.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर
मो.नं. ९७६४१४०७७७. ९४०४३२१०६४ कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- १०६४.